# महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि

**पुणे- २९/०१/२०२०**

**विषय- पुणे मेट्रोचे सिव्हिल, इलेक्ट्रिक, ट्रॅक व रोलिंग स्टॉक संबंधीचे काम प्रगतीपथावर.**

पुणे मेट्रो भूमिपूजन समारंभाला नुकतेच तीन वर्षे पूर्ण झाली आहेत परंतु प्रत्यक्ष काम सुरु होऊन केवळ ३० महिने पूर्ण झाली आहेत. गेल्या ३० महिन्यात पुणे मेट्रोने अत्यंत तत्परतेने मेट्रोसाठी आवश्यक असणाऱ्या जागेचे अधिग्रहण , मेट्रो खांबांची उभारणी, स्पॅनची उभारणी, सेगमेंट, कास्टिंग, ट्रॅक बिछावणी, इलेक्ट्रिक खांबांची उभारणी, विद्युत तारांची बांधणी (OHE), टनेल बोरिंग मशीन कंमिशनिंग व भुयारी मार्गाच्या प्रत्यक्ष कार्याला सुरूवात . मेट्रोने केलेल्या या कामाचा आवाका बघता अत्यंत वेगाने काम करणाऱ्या मेट्रोमध्ये पुणे मेट्रोला स्थान मिळाले आहे. कामाच्या द्रुष्टीने मेट्रोची कामे वेगाने होण्यासाठी संपूर्ण मार्गिकेची पाच विभागांमध्ये वाटणी करण्यात आली आहे. वनाझ ते सिविल कोर्ट या भागाला रिच- १, पीसिएमसि ते सिविल कोर्ट रिच-२, सिविल कोर्ट ते रामवाडी या भागाला रिच-३, सिविल कोर्ट (भुयारी मार्ग) ते फडके हौद याला UG-1 व फडके हौद ते मंडई याला UG-2 असे नामांकन करण्यात आले आहे.

वनाझ ते सिविल कोर्ट (रिच-१ ) या भामध्ये एकूण ४६४ खांबांपैकी ३१० खांब तसेच ४२६ स्पॅन पैकी १२६ स्पॅनची काम पूर्ण करण्यात आले आहे. सेगमेंट कास्टिंग मध्ये देखील ३९४६ पैकी २४३१ सेगमेंटचे कॅस्टिन्ग पूर्ण करण्यात आले आहे. अश्या प्रकारे रिच-१ येथील कार्य अत्यंत वेगाने सुरु आहे.

पीसिएमसि ते कृषी महाविद्यालय या रिच-२ मार्गिकेत ३११ पैकी २६२ खांब पूर्ण करण्यात आले आहेत. तसेच २९६ स्पॅन पैकी १२१ स्पॅनची उभारणी करण्यात आली आहे. एकूण २५७६ सेगमेंट पैकी १६२२ सेगमेंटची कास्टिंग पूर्ण करण्यात आलेले आहे. या विभागात देखील कार्य अत्यंत वेगाने सुरु आहे.

सिविल कोर्ट ते रामवाडी या उन्नत मार्गावर १९५ पैकी १०२ खांबांची उभारणी आतापर्यंत उभारणी झालेली आहे. तसेच ३०५ स्पॅन पैकी ३० स्पॅनची उभारणी करण्यात आली आहे. या विभागात लागणाऱ्या २६९० सेगमेंट पैकी ९१७ सेगमेंटचे चॅटिंग पूर्ण करण्यात आले आहे. सिविल कोर्ट ते रामवाडी या मार्गिकेत दोन ठिकाणी नदी पार करावी लागत आहे तसेच रेल्वे रुळदेखील पार करावा लागणार आहे. त्यामुळे या विभागांचे कार्य अत्यंत जिकरीचे आहे. नदी पात्रातील कामदेखील पूर्णत्वाकडे आहे.

मेट्रो मार्गिकेमध्ये स्पॅनची उभारणी झाल्यानंतर रेल्वे रूळ टाकण्याचे काम देखील तत्परतेने हाती घेण्यात आले आहे. रिच-१ मार्गिकेत एकूण ८ किलोमीटर लांबीचे रूळ टाकण्यात आले आहेत . तसेच वनाझ ते सिविल कोर्ट ह्या रिच-२ मार्गिकेत २.२ किलोमीटरचे रूळ टाकण्यात आले आहे.

रेल्वे रुळाच्या कामानंतर रेल्वे विद्युत तारांसाठी खांबांची उभारणी देखील प्रगती पथावर चालू आहे. पीसिएमसि ते कृषी महाविद्यालय या भागात १६१ पैकी ११४ खांबांची उभारणी करण्यात आली आहे तसेच या मार्गिकेत १. ४५ किलोमीटर लांबीच्या विद्युत तारा लावल्या असून त्यांच्या मध्ये वीज प्रवाहदेखील सोडण्यात आला आहे. या मार्गिकेसाठी वल्लभ नगर येथे अद्ययावत इलेक्ट्रिक सबस्टेशनची देखील उभारणी करण्यात आली आहे. या बरोबरच वनाझ ते सिविल कोर्ट या रिच-२ मार्गिकेत १३४ पैकी ५६ इलेक्ट्रिक खांबांची उभारणी करण्यात आली आहे. विद्युतसंबंधी इतर कामे देखील अत्यंत वेगाने सुरु आहे.

डिसेंबर २०१९ च्या शेवटच्या आठवड्यात पुणे मेट्रोसाठी दोन ट्रेन संच मागविण्यात आले व त्याना प्रत्यक्ष ट्रॅकवर ठेऊन त्यांची चाचणी घेण्यात आली. प्रत्येक ट्रेन संच मध्ये तीन कोच असून यापैकी एक कोच महिलांसाठी राखीव आहे. हे कोच वातानुकूलित असून त्यामध्ये २७० ते ३०० व्यक्तींना _करण्याची क्षमता आहे. या कोचमध्ये महिला व दिव्यांगांसाठी विशेष व्यवस्था करण्यात आली आहे.

पुणे मेट्रोच्या ट्रेनचे अनुरक्षण (मेन्टेनन्ससाठी ) वनाझ हिलव्यूपार्क व रेंज हिल येथे टप्यांची उभारणी करण्यात आली आहे. या डेपोंचे ३० टाक्यावर काम पूर्ण झालेअसून महत्वाचे असे फाऊंडेशनची काम जवळजवळ संपले आहे.

पुणे मेट्रोचे कृषी महाविद्यालय ते स्वारगेट हा पाच किलोमीटरचा टप्पा भुयारी मार्गाचा असणारा असून त्यासाठी लागणाऱ्या दोन टनेल बोरिंग मशीन महामेट्रोकडे आले असून त्यांनी प्रत्यक्ष काम सुरु झाले आहे. आज तागायत सहाशे मीटरचा भुयारीमार्गाचे प्राथमिक काम पूर्ण करण्यात आले आहे. भुयारी मार्गासंबंधी बिल्डिंग कंडिशन सर्वेचे काम ९० टक्के पूर्ण झालेले आहे.

पुणे मेट्रोचे संत तुकारामनगर , फुगेवाडी, आनंद नगर येथे मेट्रो स्थानकांची उभारणी देखील अत्यंत वेगाने सुरु आहे. सर्व स्टेशनची कामे ५० टक्क्यांवर पूर्ण झालेली आहेत. स्टेशन साठी लागणाऱ्या लिफ्ट आणि एस्कलेटर यांची देखील बरीच उभारणी चालू आहे.

आतापर्यत पुणे मेट्रोचे ३७ टक्के काम पूर्ण झाले. पुणे मेट्रोचे काम नियोजित वेळेवर पूर्णकारण्यासाठी महामेट्रो कटिबद्ध असून त्या दृष्टीने सर्व यंत्रणा कार्यरत आहे.